SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR – 416 004.
P.G. Admission – 0231- 2609142, 2609488, 2609449.
Phone : EPABX – 2609000. Website :
www.unishivaji.ac.in
email : pgadmission@unishivaji.ac.in
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर. – ४१६००४.
पदव्युत्तर प्रवेश विभाग : २६०९१४२, २६०९४८८, २६०९४४९.
फोन : ईपीएबीक्स – 2609000. वेबसाईट :
www.unishivaji.ac.in
ई.मेल : pgadmission@unishivaji.ac.in

Estd. 1962
"A++"
Accredited by
NAAC (2021) with
CGPA 3.52

जा.क्र. शिवाजी वि./पी.जी.प्रवेश/शिवाजी वि.गुण.शिष्य/1560 दि. 4 NOV 2025

## परिपत्रक

प्रति,

१. मा.प्राचार्य/संचालक
सर्व संलग्नित महाविद्यालये व परिसंस्था

२. मा.अधिविभाग प्रमुख/समन्वयक/संचालक,
सर्व पदव्युत्तर अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**विषय : सन २०२५–२०२६ या शैक्षणिक वर्षातील 'शिवाजी विद्यापीठ गुणवत्ता शिष्यवृत्ती'स मुदतवाढ देणेबाबत.**
**संदर्भ : जा.क्र.शिवाजी वि./पी.जी.प्रवेश/शिवाजी वि.गुण.शिष्य/१५४२, दि. १४/१०/२०२५ रोजीचे परिपत्रक.**

महोदय/महोदया,

उपरोक्त विषयान्वये आपणास कळविण्यात येते की, शिवाजी विद्यापीठामार्फत प्रतिवर्षी विद्यापीठ संलग्नित महाविद्यालये व विद्यापीठ अधिविभागामध्ये पदवी व पदव्युत्तर नियमित अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेल्या हुशार, गुणवंत आणि होतकरू विद्यार्थ्यांना एकूण सात प्रकारामध्ये 'शिवाजी विद्यापीठ गुणवत्ता शिष्यवृत्ती' प्रदान करण्यात येते.

विद्यापीठाच्या मार्च/एप्रिल, २०२५ मध्ये झालेल्या परीक्षेत जे विद्यार्थी/ विद्यार्थीनी ६० टक्के पेक्षा अधिक गुण मिळवून गुणानुक्रमे पहिल्या प्रयत्नात उत्तीर्ण झालेले आहेत व पुढील शिक्षणासाठी आपल्या महाविद्यालय /अधिविभागामध्ये नियमित विद्यार्थी म्हणून प्रवेश घेतलेला आहे, अशा संभाव्यपात्र विद्यार्थी/विद्यार्थीनींना संपर्क करून त्यांचे ऑनलाईन नामाकंन अर्ज **https://sukapps.unishivaji.ac.in/exam-app/#/login** या लिंकवरून दि.०६/११/२०२५ पूर्वी महाविद्यालय/अधिविभाग यांना भरण्याकरीता मुदत देण्यात आली होती.

तथापि दिपावली सुटटीच्या कारणास्तव नामाकंन अर्ज भरून घेण्याकरीता दि.२०/११/२०२५ पर्यत मुदतवाढ देण्यात आली आहे. तसेच उपरोक्त संदर्भिय परिपत्रकासोबतच्या सुचनापत्रानूसार कार्यवाही करून दि.२५/११/२०२५ पर्यत अपलोड केलेल्या कागदपत्रासह नामाकंन अर्जाच्या हार्ड कॉपी विद्यापीठ कार्यालयात पाठवाव्यात. यापुढे कोणत्याही सबबीवर नामाकंन अर्ज भरण्यास मुदतवाढ दिली जाणार नाही. कृपया याची नोंद घ्यावी.

कळावे,

आपला विश्वासू
(डॉ. व्ही. एन. शिंदे)
कुलसचिव

प्रत माहितीसाठी :
१) स्वीय सहाय्यक, मा. कुलगुरु यांचे कार्यालय
२) स्वीय सहाय्यक, मा. प्र– कुलगुरु यांचे कार्यालय
३) स्वीय सहाय्यक,मा. कुलसचिव यांचे कार्यालय
४) स्वीय सहाय्यक, मा. वित्त व लेखाधिकारी यांचे कार्यालय
५) स्वीय सहाय्यक, मा. संचालक, परीक्षा व मुल्यमापन मंडळ यांचे कार्यालय

**माहितीसाठी व पुढील कार्यवाहीसाठी :–**
१) प्र. संचालक, संगणक केंद्र
२) उपकुलसचिव, ऑन परीक्षा विभाग
३) विभागप्रमुख, सर्व ऑन परीक्षा विभाग
४) आवक विभाग :– सदर शिष्यवृत्तीसाठी येणारे अर्ज पदव्युत्तर प्रवेश विभाग येथे पाठविणेत यावेत.

Scanned with OKEN Scanner